# गाळणे किल्ला




**किल्ल्याचा प्रकार :** गिरीदुर्ग
**जिल्हा :** नाशिक
**डोंगररांग:** गाळणा टेकड्या
**श्रेणी :** मध्यम

## पहाण्याची ठिकाणे :

किल्ल्याचा परिसर हा किल्ल्याच्या पहिल्या दरवाज्या पासूनच सुरु होतो. या दरवाज्याच्या आजुबाजुला पडक्या तटबंदीचे अवशेष दिसतात. या दरवाज्याच्या बाजुला पहारेकऱ्याच्या देवड्या सुध्दा आहेत. येथून आत शिरल्यावर आपण गडाच्या दुसऱ्या दरवाज्यात पोहचतो. दरवाजा पाहूनच आपल्याला त्याच्या मजबूतीची पूर्ण कल्पना येते. दरवाज्याच्या वरच्या भागातील महिरीपी पाहून त्या काळातील कलाकुसरीची कल्पना करता येते. दरवाज्याच्या वरच्या भागात एक पर्शियन शिलालेख कोरलेला आहे. दरवाज्यातून आत गेल्यावर पहारेकऱ्यांच्या देवड्या लागतात. या दरवाज्याला लोखंडी दरवाजा असेही म्हणतात. दरवाज्याच्या आतल्या बाजूने कमानीवर जाता येते. या दरवाज्यातून थोडे पूढे गेल्यावर दोन वाटा फुटतात, एक वाट उजवीकडे तिसऱ्या दरवाज्याकडे वळते, तर समोरची वाट दिंडी दरवाज्याकडे जाते. दिंडी दरवाज्यातून एक वाट खाली गावात उतरते, पण ही वाट बरीच गैरसोयीची आहे. तिसऱ्या दरवाज्यातून आत शिरल्यावर पुढची वाट काटकोनात वळते. या ठिकाणी एका बाजूला कातळभिंत तर दुसऱ्या बाजुला किल्ल्याची तटबंदी यामधील चिंचोळ्या भागातून आपण पुढे जातो. थोड्याच अंतरावर किल्ल्याचा चौथा दरवाजा लागतो. दरवाज्यातून आत शिरल्यावर तीन वाटा लागतात. समोर जाणारी वाट ही किल्ल्याच्या माथ्यावर जाते. आपण आधी डावीकडची वाट पकडायची. तटबंदीवरुन चालत असतांना गाळण्याची तटबंदी किती मजबूत आहे, याची कल्पना येते. बुरुजांवर तोफा ठेवण्यासाठी असणाऱ्या खांबाची व्यवस्था केलेली दिसते. या भागाच्या सर्वात शेवटी एक गुप्त दरवाज्या आहे. पण तिथपर्यंत जाण्याची वाट ढासळलेली आहे. तटबंदी आणि किल्ल्याची कातळभिंत यामध्ये बरीच पाण्याची टाकी सुध्दा आहेत. हे सर्व पाहून चौथ्या दरवाज्यापाशी परतायचे.

आता उजवीकडची वाट धरायची, तटबंदीवर असणारी एक कमान ढासळलेली असल्याने तिथपर्यंत जाता येत नाही. थोडे पुढे गेल्यावर आपण सज्जापाशी येऊन पोहचतो. हाच तो सज्जा जो खालून आपले लक्ष वेधून घेत असतो. इथून किल्ल्याचे चारही दरवाजे व्यवस्थित दिसतात. इथून पुढे गेल्यावर डावीकडच्या

कातळात काही गुहा कोरलेल्या दिसतात. यापैकी एका गुहेत महादेवाची पिंड आहे. तिचे दर्शन घेऊन पुढे निघायचे, डावीकडची तटबंदी अचानक खाली काटकोनात वळते. इथेच कोपऱ्यात एक गुप्त दरवाजा आहे. यातून खाली उतरण्याची वाट आपल्याला राजगडाच्या तिहेरी तटबंदीमधून काढलेल्या दरवाज्यातून खाली उतरणाऱ्या पायऱ्यांची आठवण करुन देते. खाली उतरल्यावर समोरच एक पाण्याचे टाके दिसते. इथून थोडे अंतर पुढे गेल्यास एक वाट कातळातून खाली उतरत जाऊन किल्ल्याच्या दुसऱ्या दरवाज्याला येऊन मिळते. पण ही वाट बरीच कठीण आहे. हे सर्व पाहून दरवाज्यातून वर यायचे किल्ल्याची तटबंदी बरीच लांब पर्यंत पसरलेली दिसते. वेळ असल्यास या तटबंदीवरुन चालत जाऊन संपूर्ण किल्ल्याला वळसा सुध्दा मारता येतो. अन्यथा माघारी फिरुन चौथ्या दरवाज्यापाशी यायचे आणि माथ्याकडची वाट धरायची. वर पोहचल्यावर समोर एक दर्गा दिसतो. या दर्ग्याची इमारत दुमजली आहे. दर्ग्याच्या आतील खांबावर अरबी मधील कुराणाच्या आयत्या कोरलेल्या आहेत. मागचा जिना चढून दर्ग्याच्या गच्चीवर चढून जायचे. गच्चीवरुन कंक्राळ किल्ला, धुळ्याचा लळींग, भामेर याचे सुंदर दर्शन होते. दर्ग्याच्या मागच्या बाजूस एक बांधीव तळे आहे. हेच काय ते किल्ल्यावरील एकमेव पिण्याच्या पाण्याचे तळे. दर्ग्याच्या समोरुन एक वाट किल्ल्याच्या पूर्व टोकाला जाते. येथे काही वाड्यांचे अवशेष आहेत. दर्ग्या जवळून एक वाट किल्ल्याच्या सर्वोच्च माथ्याकडे जाते. या वाटेने सर्वोच्च माथा गाठायचा. या माथ्यावर काही कबरी आहेत. एक दोन वाड्यांचे अवशेष सुध्दा आहेत. येथून किल्ल्याचा पूर्ण घेरा नजरेस पडतो. संपूर्ण गड फिरण्यास ७ ते ८ तास लागतात. गडफेरी करायची असल्यास ४ तास जास्तीचे हवेत.

## पोहोचण्याच्या वाटा :

गाळणा किल्ल्यावर जाण्यासाठी मालेगाव आणि धुळे या दोंन्ही बाजूंनी रस्ते आहेत. आपल्याला मालेगाव - डोंगराळे मार्गे गाळणा गावात पोहचता येते. मालेगावाहून डोंगराळे पर्यंत येण्यास एसटी बसेस आहेत. मालेगाव - डोंगराळे अंतर साधारणत: ३० किमी आहे. धुळ्याहूनही डोंगराळ्याला बसेस आहेत. हे अंतर साधारणपणे ३५ कि.मी आहे. डोंगराळेहून ४ किमी अंतरावर असलेल्या गाळणा गावात पोहचता येते. गाळणा हेच किल्ल्याच्या पायथ्याच्या गाव. गाळणा गावात गोरक्षनाथाचा एक मठ आहे. या मठाच्याच बाजूने किल्ल्यावर जाण्याची वाट आहे. या वाटेने आपण अवघ्या १० मिनीटांतच किल्ल्याच्या पहिल्या दरवाज्यात पोहोचतो.

# कंक्राले




**किल्ल्याचा प्रकार :** गिरीदुर्ग


**डोंगररांग:** गाळणा टेकड्या

**जिल्हा :** नाशिक

**श्रेणी :** मध्यम

नाशिक जिल्हयात सीमेवर मालेगाव तालुक्यात एक किल्ला आहे, याचे नाव कंक्राळा किल्ला. गाळणा किल्ल्याचा सखा सोबती हा कंक्राळा किल्ला .

Kankrala Kankrala




# भूगोल :

# पहाण्याची ठिकाणे :

खिंडीच्या अलिकडे उजव्या बाजूच्या कातळ भिंती मध्ये एक सुमधुर असे पाण्याचे टाके आहे. याच्याच जवळ झाडावर एक भगवा ध्वज देखील फडकत असतो. खिंड ही कंक्राळ्याच्या डोंगरामुळेच तयार झालेली असल्यामुळे या खिंडीत तटबंदीचे अवशेष दिसतात. ही तटबंदी आता मात्र बऱ्याच मोठ्या प्रमाणावर ढासळलेली आहे. तटबंदीच्याच वरच्या भागात पाण्याची एक ते दोन टाकी आढळतात. संपूर्ण गडमाथ्यावर पाण्याची टाकी बरीच आहेत. काही ठिकाणी वाड्यांचे चौथरे दिसतात. एका ठिकाणी उघड्यावर हनुमानाची मूर्ती पडलेली दिसते. सर्व किल्ल्याचा फेरफटका मारण्यास अर्धा तास पुरतो. कंक्राळ्याहून गाळण्याचा किल्ला समोरच दिसतो.

# पोहोचण्याच्या वाटा :

नाशिक मार्गे मालेगावला यावे. मालेगावहून डोंगराळे कडे जातांना मालेगाव पासून ३० कि.मी अंतरावर करंजगव्हाण नावाचे गाव आहे. या गावा पासून ८ ते १० किमी अंतरावर कंक्राळा गाव आहे. मालेगावहून करंजगव्हाण पर्यंत जाण्यास जीपगाड्या मिळतात. कधी कधी काही गाड्या थेट कंक्राळ्या पर्यंत सुध्दा जातात. कंक्राळा गावातून किल्ल्याचे सुंदर दर्शन होते. कंक्राळा गाव ते किल्ला यामध्ये बरेच अंतर आहे. किल्ल्याचा पायथा गाठण्यासाठी किमान दोन कि.मी पायी तंगडतोड करावी लागते.पायथ्याला फक्त एक दोन घरांची वस्ती आहे. कंक्राळ्याच्या डोंगरांमुळेच किल्ल्याच्या मध्ये एक खिंड झाली आहे. वस्ती पासून खिंड गाठण्यास अर्धा तास लागतो. वाट मळलेली असल्याने चुकणे अशक्य आहे.

## राहाण्याची सोय :

किल्ल्यावर राहण्याची सोय नाही.

## जेवणाची सोय :

किल्ल्यावर जेवणाची सोय नाही.

## पाण्याची सोय :

किल्ल्यावर पिण्याच्या पाण्याचे टाके आहे.

# मालेगाव किल्ला



मालेगावचा किल्ला – Malegaon Fort

किल्ल्याचा प्रकार: भुईकोट किल्ला


चढाईची श्रेणी: सोपी

जिल्हा: नाशिक

तालुका: मालेगाव

मालेगाव हे महाराष्ट्रामध्ये प्रसिद्ध तालुक्याचे गाव असून ते नाशिक जिल्ह्यामध्ये आहे.नाशिकच्या ईशान्य दिशेला मालेगाव असून मुंबई -आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्र. ३ हा मालेगावातून जातो. नाशिक, धुळे, जळगाव, चाळीसगाव, औरंगाबाद येथून गाडीमार्गाने मालेगावला पोहोचता येते. या सर्व मार्गांवर एस.टी. बसेसची सोय आहे.इतिहासइतिहासाचा वारसा जपणाऱ्या मालेगावात मोसम नदीच्या काठावर बलदंड असा किल्ला आहे. हा किल्ला मालेगावचा भुईकोट किल्ला म्हणून ओळखला जातो. हा किल्ला नारोशंकर यांनी बांधला आहे. इ.स. १७४० मध्ये हा किल्ला नारोशंकर यांनी बांधला असल्याचे मत मराठ्यांचा इतिहास लिहणारे ग्रांट डफ यांनी नमूद केले आहे. एका उल्लेखानुसार १८२० मध्ये मालेगावाचा किल्ला साठ वर्षोपूर्वी बांधला असा उल्लेख केलेला आहे. त्यानुसार हा किल्ला १७६० मध्ये बांधला असावा, असे दिसते.नारोशंकर हे सरदार होते. ते बराच काळ उत्तर भारतात होते. उदोजी पवार यांच्याकडे शिलेदार म्हणून असणारे नारोशंकर पुढे इंदोरचे सुभेदार झाले. त्यांनी ओरछा जिंकून घेतले. झाशीमध्ये १४ वर्षे त्यांचे वास्तव्य होते. त्यावेळी मोगल बादशहा आलमगीर गाझी होता. आलमगीर गाझी शिकारीच्या मोहिमेवर असताना नारोशंकर सोबत होते. बादशहाने शिकारीच्या दरम्यान सिंहावर बंदुकीतून गोळी झाडली. ती गोळी हुकली. चवताळलेल्या सिंहाने बादशहावर झेप घेतली. नारोशंकर यांनी झेप घेणाऱ्या सिंहाला तलवारीने मारले, त्यामुळे बादशहा बचावला. बादशहाने नारोशंकर यांची प्रशंसा करून त्यांना ‘राव बहादूर’ हा किताब देऊन मालेगाव परिसरातील निंबायती आणि सात-आठ खेड्यांचा परिसर जहागीर म्हणून दिला.पुढे पेशव्यांनी नारोशंकर यांना महाराष्ट्रामध्ये बोलावून घेतले. पेशव्यांबरोबर झालेला बेबनाव मिटवण्यात नारोशंकर यांना यश आले. नारोशंकर यांनी मालेगाव येथे वाडा बांधण्याची परवानगी पेशव्यांकडून मिळवली. मोसम नदीच्या काठावरची जागा उत्तम असल्याची माहिती सल्लागारांनी नारोशंकर यांना दिली होती. मात्र नारोशंकर यांनी वाडा न बांधता किल्लाच बांधून काढला. नारोशंकर यांनी किल्ला बांधण्यासाठी उत्तर भारतामधून कारागीर आणले. नारोशंकर यांच्यावरही उत्तर भारतातील किल्ल्यांचा प्रभाव असावा असे मालेगावच्या किल्ल्याच्या बांधकामावरून

दिसते.किल्ल्यावरील पहाण्यासारखी ठिकाणेमूळ चौरस आकाराचा भक्कम किल्ला आहे. त्याच्या भोवती साधारण ४० ते ४५ फूट अंतरावर बाहेरची तटबंदी उभी करण्यात आली आहे. या तटबंदीच्या बाहेर रुंद आणि खोल असा खंदक खंदून त्यात मोसम नदीचे पाणी खेळवून किल्ला अभेद्य करण्यात आला आहे.उत्तराभिमुख असा किल्ल्याचा दरवाजा आहे. तो खंदकावरील पुलाने जोडला आहे. हा मुख्य दरवाजा सध्या मोडकळीला आला आहे. दरवाजातून आत शिरल्यावर समोरच मूळ किल्ल्याची तटबंदी आहे. आतील आणि बाहेरील भिंतींमधून फेरी मारता येते. किल्ल्याच्या बाहेरील तटबंदीवर चढण्यासाठी पायऱ्यांचा मार्ग केलेला आहे. बाहेरील खंदक माती आणि कचऱ्याने भरत आला आहे. त्यात काही भागात वस्तीही झाली आहे.दारामध्ये तोफा ठेवलेल्या आहेत. बाजूला रंगमहाल आहे. त्याचा देखणा दरवाजा आणि त्याच्या लाकडी फळ्या अजून शाबूत आहेत. रंगमहालात नक्षीकाम पाहता येते. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. सर्वात वरच्या बाजूला सुबक बांधणीच्या दोन छत्र्या आहत. उत्तम नक्षीकामाच्या या छत्र्यांचा दगड उन्हापावसाने झिजून चालला आहे.मालेगाव किल्ल्याचे बलदंड बुरूज, खंदक, दरवाजाची लाकडे यांची वेळीच निगा राखली गेली नाही, तर ते काळाच्या पडद्याआड कधी निघून जातील



हे कळणारच नाही.महत्त्व:भुईकोट किल्ला असून देखील मालेगावचा किल्ला इंग्रजांना लढून घेता आला नाही. तो त्यांनी फितुरीने घेतला.

## चंदनपुरी



खंडोबा हे महाराष्ट्रातील असंख्य कुळांचे कुलदैवत आहे. या असंख्य कुलात ब्राम्हण, धनगर, भोई, लोहार, सुतार, कोळी, गवंडी, माळी, तेली आणि मराठा समाज अशा अनेक जातींचा समावेश आहे. या मधील बहुतेक लोक आपल्या घरात खंडोबाचे कुलदैवत म्हणून पुजन करतात. या महान दैवताची महाराष्ट्रात सात तर कर्नाटकात पाच अशी बारा प्रमुख स्थाने मानली जातात. जेजुरी, पाली, निमगाव दावडी, शेगुड, सातारे, माळेगाव, नळदुर्ग, अणदूर, आदि मैलार, देवरगुड्डा, मंगसुळी हि बारा स्थाने खंडोबाची प्रमुख स्थाने म्हणून ओळखली जातात. परंतु चंदनपुरी हे खंडोबाची दुसरी पत्नी बाणाबाई हिचे माहेर असल्यामुळे अर्थातच येथेही खंडोबाचे वास्तव्य आहे.

हे स्थान महाराष्ट्रा मध्ये नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात आहे. नाशिक – मालेगाव मार्गावर मालेगावचे अलीकडे चंदनपुरी पहाता आहे, या फाट्यापासून तीन कि. मी. अंतरावर

गिरणा नदीच्या काठी चंदनपुरी हे गाव आहे आणि हेच चंदनपुरी म्हणजे बाणाबाईचे माहेर होय.

चंदनपुरी हे गाव लहान असले तरी खंडोबा देवस्थानामुळे नगर, नाशिक, धुळे, जळगाव या जिल्ह्यातील लोकांचे ते श्रद्धास्थान बनले आहे. गावची लोकवस्ती सुमारे दहा हजाराच्या आसपास आहे, गावाचा परिसर निसर्गरम्य असल्यामुळे गावात सर्वत्र शांतता नांदत असल्याची खात्री पटते.

मंदिराला चारही बाजूनी दगडी तट असून मंदिराच्या मुख्य प्रवेश द्वाराबाहेर समोरच एक भव्य दीपमाळ आहे, मंदिरात प्रवेश केल्यानंतर समोरच उजव्या व डाव्या बाजूस अशा दोन दिपमाळा आहेत, डाव्या बाजूस शंकराची पिंडी आणि समोरच नंदी आहे.

मंदिराचा गाभारा लहान आहे, परंतु त्या मानाने मंडप भव्य आहे. गाभाऱ्यात गेल्यावर आतील मागच्या भिंतीत एक मोठी देवळी आहे, त्या देवळीत खंडोबा, म्हाळसा व बाणाई यांच्या मुर्त्या आहेत. या मुर्त्या संगमरवरी दगडाच्या असून या अलीकडच्या काळात बसवल्याचे सांगितले जाते. पूर्वी या तीनही मुर्त्या काळ्या पाषाणाच्या होत्या, त्या भग्न झाल्यामुळे त्यांना गिरणा नदीत विसर्जित केल्याचे सांगितले जाते, असे काही ग्रामस्थ सांगतात. एक विशेष महत्वाचे म्हणजे चंदनपूरी हे बाणाईचे माहेर असल्यामुळे या ठिकाणी खंडोबाच्या डाव्या हाताला तिला मनाचे स्थान मिळाले आहे. आणि दुसरे असे कि येथे खंडोबाच्या शेजारी बाणाबाई प्रतिष्टीत पणे स्थानापन्न झाली आहे.

मंदिरासमोर गिरणा नदीच्या पात्रा जवळ बाणाबाईची न्हाणी आहे. गावाच्या पश्चिमेस एक छोटेसे मंदिर आहे, हे मंदिर बाणाईचे आहे, मंदिरात बाणाईची मूर्ती आहे.

येथे देवाचा उत्सव पौष पौर्णिमेपासून पुढे पंधरा दिवस असतो, हे पंधरा दिवस म्हणजे चंदनपुरीची यात्रा होय. या यात्रेला नाशिक, नगर, जळगाव, धुळे या सर्व जिल्ह्यातून आणि मालेगाव तालुक्यातून डोंगरगाव, पाटणे, मालेगाव, तिसगाव, उमराणा, नांदगाव, पिंपराळे आणि चाळीसगाव या सर्व जिल्हे, तालुके आणि त्यामधील गावा मधून सुमारे दिड लाख यात्रेकरू या यात्रेला येतात. सुरुवातीचे आठ दहा दिवस फारच धाम धुमीचे असतात. प्रत्येक यात्रेत हौशे, नवशे आणि गौशे असतात. तसे या यात्रेत हि काही नवशे भक्त देवाचा नवस फेडण्यास येतात. चार पाचशे बोकड, मेंढे बळी दिले जातात. काही भक्त देवाला घनता बांधून, लंगर तोडून, तळी भरून नवस फेडतात. काही भक्त जागर करतात, भंडारा उधळतात.vवाघ्या मुरळ्याचे कार्यक्रम तर अहोरात्र चालूच असतात. यात्रे प्रसंगी गावाला बाजार पेठेचे रूप येते.

महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही राज्यात मिळून बारा ठिकाणी खंडोबाची स्थाने आहेत. त्यातील महाराष्ट्रात सात व कर्नाटकात पाच अशी पुढील प्रमाणे आहेत.

- महाराष्ट्र
- पुणे – जेजुरी आणि निमगाव दावडी
- सातारा – पाली
- अहमदनगर – शेगुड
- औरंगाबाद – सातारे
- नांदेड – माळेगाव
- उस्मानाबाद – नळदुर्ग व अणदूर
- कर्नाटक
- बिदर – आदी मैलार

- गुलबर्गा – मैलापूर
- बेल्लारी – मैलार
- धारवाड – देवरगुड्डा
- बेळगाव – मंगसुळी

या बाराही खंडोबाच्या स्थानी होणारे सण उत्सव पुढील प्रमाणे:

- मार्गशीर्ष शु. प्रतिपदा ते शु. षष्ठी हे सहा दिवस चंपाषष्ठी म्हणून साजरे केले जातात.
- सोमवारी आलेल्या अमावास्येला सोमवती अमावस्या साजरी केली जाते.
- प्रत्येक महिन्याची पौर्णिमा, विशेषतः चैत्र पौर्णिमा व पौष पौर्णिमा या दोन मोठ्या मानल्या जातात.
- नवरात्र – अश्विन शु. प्रतिपदेपासून ते अश्विन शु. दशमी पर्यंत म्हणजे विजयादशमी अर्थात दसरा हे दहा दिवस मोठ्या उत्साहात साजरे करतात, जेजुरीत याला “मर्दानी दसरा” असे म्हणतात. विशेषतः हे सर्व उत्सव जेजुरीत मोठ्या प्रमाणात साजरे होतात.
- चैत्र शु. दशमी ते चैत्र पौर्णिमा हा उत्सव कर्नाटकात मंगसुळी येथे मोठ्या थाटात साजरा करतात.
- संक्रांतीच्या वेळी कर्नाटकात मैलापूर येथे हा उत्सव साजरा केला जातो.
- मार्गशीर्ष वद्य त्रयोदशी ते पौष शु. त्रितीया हे सहा दिवस माळेगाव येथे उत्सव असतो.
- तसेच रविवार व सोमवारी खंडोबाला अभिषेक केला जातो.

हे सर्व उत्सव खंडोबाच्या प्रत्येक स्थानी होतात, फक्त प्रेत्येक ठिकाणी पद्धत वेगळी असते. उद्देश्य एकच “खंडोबाची भक्ती संकटापासून मुक्ती”.

तळी भरते वेळी म्हणावयाचा श्लोक:

अगडधूम नगारा | सोन्याची जेजुरी ||

निळा घोडा | पाव मे तोडा ||

मस्तकी तुरा | बेंबी हिरा ||

अंगावर शाल | सदा हि लाल ||

म्हाळसा सुंदरी | आरती करी ||

देव ओवाळी | नाना परी ||

सदानंदाचा येळकोट ||

येळकोट येळकोट जय मल्हार ||

खोबऱ्याचा खुटका | भंडाऱ्याचा भडका ||

अडकल के भडकल | भडकल के भंडार ||

बोल बोल हजारी | वाघ्या मुरळी ||

खंडोबा भगत | सलाम सलाम ||

हरहर महादेव | चिंतामणी मोरया ||

आनंदीचा उदो उदो | भैरोबाच चांगभल ||

सदानंदाचा येळकोट ||

येळकोट येळकोट जय मल्हार ||

कडेपठार महाराज कि जय ||

हेमाडपंथी शिवालय ,झोडगे (मालेगाव)




- हेमाडपंथी शिवालय:'हेमाद्री पंडित उर्फ़ हेमाड पंडित हा 'रामदेवराययादवांचा' ( तेराव्या शतकातला) राज्याचा 'श्रीकरानाधिप ' म्हणजेच अर्थमंत्री होता व रामदेवराय यादवांचा मुर

प्रधान होता. साहित्य,शिल्प,धर्म,तीर्थयात्रा या सर्वात त्याला रूचि होती. त्याने भारतीयांची धार्मिकवृत्ति व तिर्थयात्रेमागिल भक्तिभाव लक्षात घेवुन ठिकठिकाणी, देवालय बांधण्याचं पुण्यकर्म हाती घेतलं. त्यात स्वतःचा खास ठसा उमटवून गेला. मंदिर बांधकामात चुन्याच न करता केवळ दगडात मंदिर बांधण्याची पद्धत हेमाद्री पंडिताने सुरु केली. ही देवालये ' हेमाडपंथी' म्हणून शिल्प्वैशिष्ट्यांनी प्रसिद्ध झाली. महाराष्ट्र व अन्य प्रांतात आजही ही बाराव्या-तेराव्या शतकातील वैभवशाली शिल्पकलेचा,स्थापत्याचा उत्तम बोलका पुरावा आ जिल्ह्यातील अंबरनाथ,नाशिक जिल्ह्यातील सिन्नर,देवळाने,झोडगे,नगरजिल्ह्यातील श्रीगोंदे,कोकमठाण,रतनवाडी,धुळे जिल्ह्यातील बलसाणे,मेथी,जळगाव जिल्ह्यातील चांगदेव,वाघाळी,सातारा जिल्ह्यातील फलटणया सर्व ठिकाणची मंदिरे ही यादवकालीन व हेमाडपंथी शैलीतील आहे. हेमाडपंथी मंदिराच्या या मालिकेत स्वताच्या खास वैशिष्ट्यांनी शिल्पकलेचे असंख्य कलात्मक नमुने अंगाखांद्यावर खेळवत उभे आहेत. मुंबई-आग्रा महामार्गावर मालेगाव-धुळे दरम्यान "झोडगे" गाव आहे गावाच्या दक्षिणेस असेच पुरातन शिवालय आहे. स्थान महात्म्याचा प्रथम विचार करून हेमाड पंडिताने ही जागा निवडली असावी.मंदिराच्या दक्षिणेला आधारावडासारखा झुटुंबा (झोटिंग) डोंगर आहे. झुटुंबा उर्फ झोटिंगबाबा या नाथपंथीय साधूंच्या वास्तव्यानं या डोंगराला 'झुटुंबा डोंगर' म्हणून संबोध साधूंच्या वास्तव्य भूमीत तीर्थमंदिर वा पवित्र तीर्थस्थळी साधूंचा वास असतोच,या तत्वान पंडिताने मंदिराची जागा निवडली असावी. शिवाय इथं मंदिराच्या बांधकामाला लागणारी दगडांची महत्वाची सामग्री उपलब्ध असावी. या देवालयाच्या दक्षिणेला टेकडीच्या पायथ्य मोठा खड्डा आहे. या खड्ड्यात चार-सहा फुट खोलीचे सुरुंग लावून दगड काढले आहेत. ऊन,वर,पाऊस,थंडी या सर्व आपत्यांच्या चाचण्यात पाषाणाचे अभंगात्व जोखले गेले. जे भं पाषाण वगळले गेले व कामाचे पाषाण शेकडो लिटर दुधात भिजवले गेले. अशा कसोट्यांतू मृदू:पण टिकाऊ पाषाणावर नंतर कलावंतांनी मनातली सुप्त शिल्पकला साकारली आहे.झ् बाबांसारख्या सिद्ध तसेच सामान्य साधकांसाठी भव्य शिवालय निर्माण झाले.

- बाह्य रचना - सारीपाठाच्या चौकटीसारखी नागर पद्धतीची देवालयाची रचना आहे. मोठ् मोठ्या व छोट्यात छोट्या दगडांची इंच-इंच जागा कलाकुसरीतून सुटलेली नाही. पौराणिव विषयांवरील शिल्पांनी मंदिराला सर्वार्थ अलंकृत केले आहे. शिवाय मोठ्या मंदिराच्या छोट् छोट्या प्रतिकृती (उरुश्रुंगे) कळसापर्यंत मापबाद्धपणे बसविल्या आहेत. अत्यंत प्रवाही व ओघवत्या आकाराची काही प्रमाणबद्ध कामशिल्पे पाहणाऱ्याच लक्ष वेधून घेतात व खिळ ठेवतात. जमिनीपासून सर्व बाजूंनी समांतर व भौतिक नियमांत पाषाणाची प्रत्येक कडा भ आहे. मंदिराला दर्शनी भागावर व डाव्या-उजव्या बाजूला विलक्षण प्रवाही व लयदार गोलाइ केलेला अप्रतिम महिरप व त्यातील पशुशिल्प नजर हटू देत नाही.शिवाचे वाहन महानंदील

सन्मुख असे प्रशस्त पश्चिमाभिमुख प्रवेशद्वार आहे. जमिनीपासून ४०-५० फुटांवर साधना,उपासनेसाठी खोली आहे. खोलीच्या सर्व बाजूला उभ्या पाषाणांना घट्ट पकडून ठेव पाषाणांची बैठक करून कळसाकडील बांधकाम चढवत नेलं आहे. मध्यानीच्या सूर्याची कि शिवपिंडीचं दर्शन घेऊ शकतील,असे छोटे छिद्र कळसावर आहे. पश्चिमाभिमुख प्रवेशद्वार मावळतीलाही गाभाऱ्यात सूर्यप्रकाश पोहोचतो व गाभाऱ्यात भगव्या प्रकाशात न्हाऊन नि

- अंतर रचना-प्रवेशद्वार ते सभामंडपादरम्यान दोन्ही बाजूंना ओटे आहेत. चार देखणे खांब आहेत. या ओट्यावर पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी विटांच्या आकाराचे खड्डे आहेत. पक्ष्यांच वावरामुळे परिसराची मोहकता वाढेल असा हेतू या मागे असावा. सभामंडपात दोन भव्य अ अलंकृत खांब आहे व आता प्रशस्त सभामंडप,वर निमुळत्या वर्तुळाकार पायऱ्या, पायऱ्यांच पाषाण मांडणीत रंभा,उर्वशी,तिलोत्तमा,आदी स्वर्गीय अप्सरांचे नृत्यशिल्प,पखवाज व संग वादकांची अप्रतिम शिल्पयोजना केली आहे. सध्या यापैकी काही शिल्पे खोडकर मुलांच्या उपद्व्यापामुळे फुटली आहेत व ते भग्न आवशेष हि बेपत्ता आहेत. सभामंडपाच्या डाव्या-उ बाजूला दोन खोल्या आहेत.शिल्पशास्त्रात त्यांना "भोगमंडप" म्हणतात. या खोल्यात देवा अर्पण करावयाच्या वस्तू ठेवल्या जात तसेच या खोल्यात आसनासाठी पाषाण ठेवले अस त्यांचा उपयोग योगसाधना, उपासनेसाठी होत असावा पूर्व पश्चिमेकडून आवश्यक तेवढाच येण्यासाठी चौकात खिडक्या आहेत. सभामंडप ते गाभारा दरम्यानच्या अंतरालगत गाभार प्रवेशद्वाराजवळ विकारांना आत ओढण्याचा संदेश देणारे कासव आहे. गाभारा प्रवेशद्वार दोन्ही उभ्या बाजूंना वर्गातील यक्ष,किन्नर,गंधर्वाचे इशस्तवन गाणारे शिल्प व वरील आड बाजूच्या मध्यभागी विघ्नहर्ता या सर्वांचे दर्शन घडते. भक्तांचा अहंकार नम्र करावा म्हणू उंचीचे प्रवेशद्वार आहे दोन पायऱ्या उतरल्या की गाभाऱ्यात उत्तराभीमुखी शिवलिंग आहे. गंभीर,पवित्र,सात्विक अशा या मंद प्रकाशात गाभाऱ्यात विलक्षन शांतता जाणवते.